# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 12/02/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

" एक वर्षापुर्वी शेतात खुन करून फरार झालेला आरोपी गजाआड"
पोलिस स्टेशन खापा यांची कार्यवाही

पोलिस स्टेशन खापा हद्‌दीतील ढकारा गावातील शेतशिवारात मृतक राजाराम कोडवते व संशयीत फरार आरोपी नामे– कलीराम सनेदी उईके हे संत्रा बगीच्यात चौकीदारी करीत असता त्यांच्यात कोणत्यातरी अज्ञात कारणावरून भांडण होउन यातील फरार आरोपी याने मृतकच्या शरीरावर मारपीट करून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार केले. त्यावरून पो.स्टे. खापा येथे खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयातील संशयीत आरोपी याचा शोधे घेणे कामी त्याचे मुळ गावी पोतलई जि. सिवनी मध्यप्रदेश येथे खापा पोलिसांचे पथक गेले असता आरोपी हा मागील 25 ते 30 वर्षा पासून त्याचे मुळ गावी राहत नसल्याचे व तो कुठेतरी भटकती करीत असल्याचे व त्याच्याकडे कुठलाही मोबाईल फोन, आधार कार्ड किंवा त्याचा फोटो नसल्याची माहिती मिळाल्याने आरोपीचा शोध घेणे कठीन झाले होते. त्यादरम्यान आरोपी याचे शेत तलावात गेल्याने त्यास शासनाकडुन मोबदला मिळणार असल्याची व त्याकरिता त्यास आधार कार्डची अत्यंत आवश्यकता असल्याने तो आधार कार्ड काढण्या करीता दि. 15.02.2021 चे दरम्यान गावात येणार असल्याची गोपनिय माहिती खापा पोलिसांना मिळाल्याने त्याचे पथक साध्या गणवेशात सतत 5 ते 6 दिवस पोतलई गावाजवळ जंगल शिवारात थांबुन गुप्त माहिती काढत असतांना आरोपी हा दि. 11.02.2021 रोजी गावात आल्याची माहिती मिळताच खापा पोलिसांचे पथकाने त्यास ताब्यात घेवून अटक केली.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री अशोक सरंबळकर व ठाणेदार खापा पोनि श्री अजय मानकर यांचे मार्गदर्शनात पोउपनि श्री गणेश झांबरे, पोहवा प्रमोद बन्सोड, पोशि मंगेश सावरकर व पोशि संतोष परतेकी यांनी केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर